## दिलीप वेंगसरकर : हॉटेल अ‍ॅण्ड रेस्टॉरंट असोसिएशनच्या १९व्या विभागीय अधिवेशनाचे उद्घाटन

# हॉटेल, रेस्टॉरंट व्यवसाय लवकरच पूर्वपदावर

**लोकनामा प्रतिनिधी**



**नाशिक :** कोरोना काळात हॉटेल आणि रेस्टॉरंट, स्पोर्टस्सह विविध क्षेत्रे कोलमडली होती. परंतु गेल्या तीन महिन्यांपासून सर्वच क्षेत्रे पूर्वपदावर येत आहेत. हॉटेल आणि रेस्टॉरंट व्यवसायासमोर आजही अनेक अडचणी आहेत. मात्र या विभागीय अधिवेशनातून अडचणे दूर होण्यास मोठी मदत मिळेल, असा आशावाद भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांनी व्यक्त केला.

हॉटेल अँण्ड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया संस्थेतर्फे पाथर्डी फाटा येथील हॉटेल रेडसन ब्लू येथे १९ व्या विभागीय अधिवेशनाचे उद्घाटन वेंगसरकर यांच्या हस्ते झाले. यावेळी वेंगसरकर यांच्यासमोर शारजा, १९८३ च्या वर्ल्ड कपमध्ये वेस्ट इंडिज, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया यांसारखे बलाढ्य संघ होते. परंतु अष्टपैलू कामगिरी, सांघिक भावनेने खेळलो. त्यामुळे भारत पहिल्यांदाच वर्ल्डकपचा मानकरी ठरला.

क्रिकेट हा आत्मविश्वासाचा खेळ आहे. किरमानी, कपिलसह इतर खेळाडूंच्या आठवणी त्यांनी सांगितल्या. वर्ल्डकपमध्ये बलाढ्य ऑस्ट्रेलिया व इंग्लंडचा पराभव केला. त्यानंतर वर्ल्डकप भारताने पटकावला.

असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप शेट्टी यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, ८५ टक्के हॉटेल, रेस्टॉरंट व्यवसाय पूर्वपदावर आला. १५ टक्के हा परदेशी पर्यटक आल्यास होईल. त्यासाठी शासनाने विमानसेवा पूर्ववत करावी, अशी त्यांनी मागणी केली. अधिवेशनामुळे नाशिकमधील वाइन पर्यटनासोबतच धार्मिक, कृषी, सांस्कृतिक, साहसी पर्यटन तसेच त्याच्याशी संबंधित अनेक सेवांना मोठ्या प्रमाणात चालना मिळेल, असेही शेट्टी म्हणाले. चेतन मेहरा यांनी वेंगसरकर यांचा सत्कार केला. यानिमित्ताने पश्चिम विभागातील हॉस्पिटॅलिटी उद्योगातील शेकडो नामवंत व्यावसायिक नाशिकमध्ये आले आहेत. अधिवेशनाचे उद्घाटन भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार वेंगसरकर यांच्या हस्ते झाले.

### » उद्योगातील सहभागी दिग्गज

तब्बल तीन वर्षांनंतर पश्चिम विभागीय अधिवेशन होत आहे. अधिवेशनात अनेक हॉटेल व रेस्टॉरंटचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी, गुंतवणूकदार आणि उद्योगातील दिग्गज सहभागी झाले आहेत. तीनदिवसीय अधिवेशनात हॉस्पिटॅलिटी उद्योगापुढील आव्हाने, तंत्रज्ञान व उत्पादनाची माहिती, तसेच नेटवर्किंगची संधी या विषयावर चर्चा होईल. यावेळी समीर पारिख, डी. एस. अडवाणी यांच्यासह हॉटेल व्यावसायिक उपस्थित होते.